दैनिक
महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १४७ वा गुरूवार दि.0२ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

सरकारच्या प्रामाणिकपणावर जरांगे-पाटलांनी विश्वास ठेवावा

मुंबई : सरकार दोन पातळ्यांवर काम करत आहे. त्यासाठी तीन निवृत्त न्यायाधीशांची समिती नियुक्त केली आहे. त्यामुळे सरकारच्या प्रामाणिकपणावर जरांगे-पाटलांनी विश्वास ठेवावा असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथे झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना मांडले. दरम्यान, राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटला आहे. जरांगे-पाटलांनी उपोषण मागे घ्यावे यावर सर्वपक्षीय बैठकीत एकमत झाले आहे. बैठकीतील मुद्यांबाबत बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मागासवर्ग आयोग युद्धपातळीवर काम करत आहे. सर्वोच्च न्यायालयात रद्द झालेल्या आरक्षणातील त्रुटींबद्दलची पूर्तता करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मराठा समाजाला न्याय देणारा निर्णय लागेल, अशी खात्री सरकारला आणि सर्वपक्षीय नेत्यांना आहे, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते सर्वपक्षीय बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.एकनाथ शिंदे म्हणाले, ''सरकारला थोडा वेळ देण्याची आवश्यकता आहे. सर्वपक्षीय नेत्यांनी मनोज जरांगे-पाटील यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. आरक्षण मिळवण्यासाठी सरकार सर्व प्रयत्न करण्यास तयार आहे. जरांगे-पाटलांनी आपले उपोषण मागे घ्यावे, असा ठराव सर्व नेत्यांनी केला आहे.

सरकारला किती अन् कशासाठी वेळ हवा? सर्वपक्षीय बैठकीनंतर जरांगेचा सवाल

एक मराठा
लाख मराठा

मराठा आरक्षणासंदर्भात आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर सर्वपक्षीय नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीला ३२ जण उपस्थित होते. या बैठकीत मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावे या मुद्द्यावर सर्वांचे एकमत झाले. तसेच मराठा आरक्षणासाठी आणखी वेळ द्यावा अशीही मागणी करण्यात आली आहे. यानंतर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.सर्वपक्षीय बैठकीनंतर, इतर समाजावर अन्याय न होता मराठ्यांना आरक्षण मिळावं असं आमचं याबाबत सर्वांचं एकमत झालं असून मराठा आरक्षणासाठी मागासवर्गीय आयोग युध्द पातळीवर काम करत आहे. मनोज जरांगे यांनी सरकारला थोडा वेळ द्यावा, मराठा समाजाने संयम राखावा, मनोज जरांगे यांनी सरकारला सहकार्य करावे ही सर्वपक्षीय नेत्यांची भावना असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या बैठकीनंतर बोलताना म्हणाले.याबद्दल विचारले असता मनोज जरांगे यांनी सरकारला काही प्रश्न विचारले आहेत. जरांगे म्हणाले की, सरकारला किती आणि कशासाठी वेळ हवा आहे? तसेच सरसकट महाराष्ट्राला आरक्ष लगेच देणार का? समाजाला विचारून बघू अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली आहे.बैठकीत काय झालं याचा तपशील मिळाला नाही, गोरगरिबांच्या लेकरांकडे लक्ष न देता सरकार नुसत्या बैठका घेत आहे. मराठा समाजाच्या लेकरांचे विनाकारण मुडदे पडत आहेत, तरी लक्ष देत नाहीत. हसण्यावारी नेत आहेत. हे जनता सांभाळणारं सरकार म्हणायचं काय. गोरगरिबांच्या लेकरावर गुन्हे दाखल केले जात आहेत, असेही मनोज जरांगे म्हणाले.तुम्हाला सुट्टी नाही. तुम्ही मराठ्यांना आरक्षण द्या. तुम्हाला वेळ कशासाठी पाहिजे आणि का पाहिजे? आणि महाराष्ट्रातील मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणार का? हे सांगा. तुम्हाला अर्धा तास द्यायचा की वेळचं द्यायचा नाही हे आम्ही मराठे विचार करून सांगतो. तुमच्या मनात काय आहे ते तरी कळू द्या, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आरक्षणाच्या नावाने केवळ पोकळ बैठकांचे सत्र

मुंबई: कायद्याच्या कसोटीवर शाश्वत टिकणा-या मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला आणखी वेळ द्यावा, असा ठराव मुंबईतील सर्वपक्षीय बैठकीत एकमताने मंजूर झाला. सह्याद्री अतिथीगृहावर बुधवारी झालेल्या बैठकीवेळी हा निर्णय घेण्यात आला.या सगळ्या पार्श्वभूमीवर संभाजीराजे छत्रपती यांनी ट्विट करत संताप व्यक्त केला आहे. मनोज जरांगे पाटील यांची पकृती खालावत आहे. मराठा बांधव आत्महत्या करत आहेत. तरीही राज्य सरकार मात्र केवळ बैठकांच्या खेळात मग्न असल्याची टीका संभाजीराजे यांनी केली आहे. यावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय प्रतिक्रिया देतात, हे पाहावे लागेल.मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे, राज्यात आत्महत्या होत आहेत, मराठा आंदोलन तीव्र होत आहे. तरीदेखील सरकार केवळ बैठकांचा खेळ करीत आहे. अशा बैठकांमध्ये वेळ न दवडता सरकारने ठोस पावले उचलावीत. केंद्र सरकारनेही केवळ बघ्याची भूमिका न घेता तात्काळ या विषयामध्ये लक्ष घालून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, हीच आमची अंतिम मागणी आहे.गेल्या पंधरा वर्षांपासून मराठा आरक्षण चळवळीत सक्रिय असताना कोणत्याही सरकारने समाजासाठी बोलाविलेल्या एकाही शासकीय बैठकीस मी अनुपस्थित राहिलो नाही. दोन वेळेस आरक्षणही मिळाले होते. मात्र मागील सरकारच्या घोडचुकांमुळे दुर्दैवाने मराठा आरक्षण रद्द झाले व समाजाचा लढा परत एकदा तीव्र झाला.

विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक करण्याची भाजपची योजना

कोलकाता : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. त्या म्हणाल्या की, २०२४ च्या निवडणुकीपूर्वी सर्व विरोधी नेत्यांना अटक करण्याची भाजपची योजना आहे. त्यांना रिकाम्या देशात स्वत:साठी मते हवी आहेत. मनरेगा प्रकरणातही ममता यांनी सरकारला इशारा दिला. १६ नोव्हेंबरपर्यंत मनरेगाची थकबाकी भरली नाही, तर आम्ही पुढचे पाऊल जाहीर करू, असे त्यांनी सांगितले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, सुमारे ७ हजार कोटी रुपये केंद्राकडे प्रलंबित आहेत. गरीब ग्रामीण जनतेला त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जात आहे. केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांनी दिल्लीत आमच्या शिष्टमंडळाची भेट घेतली नाही. आता पैसे देण्यास आणखी विलंब झाल्यास आमचे आंदोलन शिगेला पोहोचेल.तसेच ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रगीताचा अनादर केल्याची तक्रार मुंबईतील न्यायालयाने फेटाळली आहे. राष्ट्रगीत म्हणणे म्हणजे ते गाणे असे नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. महानगर दंडाधिकारी (माझगाव न्यायालय) एसबी काळे यांनी तक्रार फेटाळताना सांगितले की, कार्यक्रमाच्या व्हीडीओ ममता बॅनर्जी राष्ट्रगीत सुरू असताना अचानक बाहेर जाताना दिसल्या नाहीत.

फडणवीस तुम्ही चर्चेला या, मराठे तुम्हाला अडवणार नाहीत : जरांगे पाटील

जालना : सर्वपक्षीय बैठकीनंतर सरकारने आपल्याकडे वेळ मागितला आहे. मी उपोषणाला बसून ७-८ दिवस झाले. सरकार आता सांगत आहेत की त्यांना वेळ हवा आहे. कशासाठी आणि किती वेळ हवाय? हे सरकारने सांगावं. मग मी समाजाशी बोलून वेळ द्यायचा की नाही ते ठरवेन. पण वेळ दिला तर सरकार आरक्षण देणार आहे का? असा उलटसवाल मनोज जरांगे पाटील यांनी विचारला. त्याचवेळी आम्ही चर्चेला चार दिवसांपासून बोलवत आहोत, पण ते येत नाहीत. पण यांना काड्या घालायची सवय लागली आहे. त्यांना जे काही म्हणणं मांडायचे आहे त्यांनी इथे येऊन मांडावे, असे जरांगे पाटील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हणाले.मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी आज (१ नोव्हेंबर) सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला सर्वपक्षीय नेत्यांनी, आमदारांनी उपस्थिती लावली. राज्य सरकार कायद्याच्या पातळीवर टिकेल, अशाच गोष्टी करेल. राजकारण कोणालाही करायचं नाही. आपण सगळे याबाबत सहकार्य करतच आहोत. पण यापुढे आपल्यातील काही नेत्यांनी आंदोलन करण्यापेक्षा सरकारची बाजूही समजून घ्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वपक्षीय नेत्यांना केलं. त्याचवेळी आंदोलकांनी आंदोलन करण्यापेक्षा सरकारची बाजू समजून घ्यावी, अशी विनंती देखील फडणवीस यांनी केली.

पानगावच्या हेमाडपंथी विठ्ठल मंदिराचा नमो तीर्थस्थळ योजनेत समावेश; विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना

लातूर : - देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागामार्फत नमो तीर्थस्थळ सुधार अभियान अंतर्गत राज्यातील ७३ ऐतिहासिक व पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येणार असून या योजनेत रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करण्यात आला आहे. दरम्यान मंदिर परिसराची पाहणी करण्याची विनंती राज्याचे पर्यटन मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना मुंबई येथे मंत्रालयात भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी मंगळवारी केली. निश्चितच आपण मंदिराची पाहणी करण्यासाठी पानगावचा दौरा करू असे सांगून सदर मंदिराचा तातडीने सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करावा अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी मंत्री महोदयांनी दिल्या.

पानागव येथील श्री विठ्ठल रुक्मीणी हे मंदिर उत्तर चालुक्य कालीन १२-१३ व्या शतकातील असावे. या मंदिरावर होयसळ, चालुक्य आणि काकतीय यांच्या कालखंडातील स्थापत्य कलेचा प्रभाव दिसून येतो. मंदिरतील सभामंडप आणि गर्भगृह हेमाडपंथी स्थापत्य शैलीचे दिसून येते. सभामंडपात कलात्मक स्तंभाची रचना असून मंदिराच्या बाह्य भागात भौमितीक नक्षीकाम तसेच देवदेवतांची शिल्पे कोरलेली दिसून येतात अशा या श्री विठ्ठल रूक्मीणी मंदिराचे जतन व्हावे, या मंदिराचा सर्वांगीन विकास व्हावा याकरीता निश्चितपणे राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा अशी मागणी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांची १५ सप्टेंबर २०२३ रोजी मंदिर ट्रस्ट पदाधिकारी व पानगाव येथील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने भेट घेऊन मागणी केली होती त्यावेळी आ. कराड यांनी संरक्षित स्मारक दर्जा बरोबरच मंदिराच्या सर्वांगीण जिर्णोदरासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू शासनाच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी मिळवून देऊ अशी ग्वाही दिली होती. पानगाव दौऱ्यात आ. रमेशअप्पा कराड यांनी मंदिराची संपूर्ण पाहणी करून या वास्तूचे जतन झाले पाहिजे त्यासाठी सर्व संबंधिताकडे आपण पाठपुरावा करू असे आश्वासन दिले होते. दरम्यानच्या काळात राज्याचे पर्यटन व सांस्कृतिक कार्यमंत्री ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि पर्यटन विभाग पुरातन विभाग यांच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडे आ. कराड यांनी पाठपुरावा केला होता केलेल्या पाठपुराव्यानुसार देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने नमो तीर्थस्थळ सुधार अभियानाच्या माध्यमातून राज्यातील ७३ ऐतिहासिक व पुरातन मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय २७ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार घेतला. या योजनेत रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करण्यात आला आहे. नमो तीर्थस्थळ सुधार योजनेत विठ्ठल रुक्मिणी मंदिर समाविष्ट झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन या मंदिराचा सर्वांगीण विकास होणार आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी मंगळवार ३१ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे पर्यटन विकास मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांची भेट घेऊन पानगावच्या विठ्ठल मंदिर परिसराला भेट देण्याची विनंती केली. यावेळी मंत्री महोदयांनी पानगावला लवकरच दौरा करण्याची विनंती मान्य करून या मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाचा तातडीने विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिल्या.

नमो तीर्थस्थळ योजनेत पानगावच्या विठ्ठल मंदिराचा समावेश झाल्याची माहिती मिळताच पानगावकरांनी मंदिरा समोर फटाक्याची आतिषबाजी करीत आनंद व्यक्त केला. सदर योजनेत विठ्ठल रुक्मिणी मंदिर समाविष्ट केल्याबद्दल मंदीर ट्रस्टच्या आणि गावकऱ्यांच्या वतीने पर्यटन आणि सांस्कृतिक विभागाचे मंत्री ना. सुधीरभाऊ मुनगुंटीवार आणि भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचे प्रदिप कुलकर्णी, ईश्वर गुडे, आंनत चव्हाण, जगन्नाथ राचूरे, सुकेश भंडारे, चंद्रकांत आरडले, गोविंद नरहारे, उत्तरेश्वर हालकुडे, ज्ञानोबा फुले, मारूती गालफाडे, जयराम कस्तूरे, बब्रूवान संपत्ते, सुर्यकांत गालफाडे, सिध्देश्वर व्यवहारे, नागनाथ फुले, बाबुराव कस्तूरे, योगिराज सिरसाट, सुरेंद्र हरीदास, दत्तात्रय भंडारे, सतिश आंबेकर, श्रीकृष्ण जाधव, अमर चव्हाण भागवत गीते, गोपाळ शेंडगे, हरिकृष्ण गुरले, रमाकांत संपत्ते, ॲड. माधव गुडे, नाथराव गिते, गणेश तूरूप, विरेन्द्र चव्हाण, रमेश केंद्रे यांच्यासह अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.

हिंसा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही : राजनाथ सिंह

ऐझॉल : मणिपूरमध्ये अधून-मधून हिंसक घटना घडतच आहेत. यावरून विरोधकांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. या मुद्यावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, मणिपूरमधील हिंसाचारामुळे आम्हाला त्रास सहन करावा लागला असला तरी गेल्या ९ वर्षांत ईशान्य भागात शांतता आहे. राजनाथ सिंह यांनी मणिपूरमधील मेतेई आणि कुकी समुदायांना एकत्र बसण्याचे, बोलण्याचे आणि विश्वासाची कमतरता दूर करण्याचे आवाहन केले. हिंसा हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही. आपल्याला मनापासून संवाद साधण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. मिझोरम विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका जाहीर सभेला संबोधित करताना ते म्हणाले की, मला प्रामाणिकपणे सांगायचे आहे की, मणिपूरमधील हिंसाचार कोणत्याही राजकीय पक्षाने भडकावला नव्हता, उलट तेथे परिस्थिती बिघडली होती. आम्हाला विश्वास आहे की, जोपर्यंत ईशान्येचा खऱ्या अर्थाने विकास होत नाही, तोपर्यंत सशक्त, समृद्ध, आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही.तसेच मणिपूर हिंसाचारावर काँग्रेस राजकारण करत असल्याचा आरोप राजनाथ सिंह यांनी केला आणि मिझोराम आणि ईशान्येसह संपूर्ण देशाला काँग्रेसच्या नकारात्मक राजकारणापासून दूर ठेवण्याची गरज असल्याचे सांगितले. विधानसभेच्या ४० जागांसाठी मिझोराममध्ये ७ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. मणिपूरमधील हिंसाचार हा तेथील मोठा मुद्दा आहे. येथे सत्ताधारी नॅशनल फ्रंट (एमएनएफ), झोराम पीपल्स मूव्हमेंट (झेडपीएम), काँग्रेस आणि भाजप रिंगणात आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

संपादकीय....

आरक्षणाच्या मागणीसाठी महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीवर घाव नको

आंदोलन, बंद अशा वेळी हिंसक कृत्ये करणाऱ्यांकडून होत असलेली हानी एसटी कर्मचाऱ्यांच्या उपजीविकेचे साधन हिसकावून घेण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीचे सूत्र ऐरणीवर आहे. मराठवाड्यात विविध ठिकाणी राज्य परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांवर दगडफेक झाली. बीड व नांदेड जिल्ह्यात बसना आग लावण्याचे प्रकार झाले. स्लीपर कोच असलेली एक बस जळून खाक झाल्याने एसटीची ३५ लाख रुपयांची हानी झाली, या बातम्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी महाराष्ट्रात सर्वांच्याच ओळखीची आहे. राज्याच्या ग्रामीण, दुर्गम भागांतील नागरिकांना या सार्वजनिक परिवहन सेवेचा कायमच विशेष आधार वाटत आला आहे. जेथे खासगी वाहतूकदार जाण्यास टाळाटाळ करतात, तेथे एसटीची सेवा पोहोचत असते किंबहुना पोहोचण्याचा प्रयत् असतोच असतो. अशी ही सार्वजनिक परिवहन सेवा म्हणजे विशेषत: ग्रामीण भागातील परिवहन क्षेत्राचा कणाच आहे; मात्र जेव्हा राज्यात हिंसक मार्गाने आंदोलने होतात, बंद पुकारले जातात, मोर्चे निघतात, तेव्हा सामान्य नागरिकांचा 'आधारवड' असलेल्या या सार्वजनिक सेवेला हमखास लक्ष्य केले जाते. आपली ही कृती एसटीची आर्थिक हानी करणारी तर आहेच. तसेच यामुळे एसटीच्या ताफ्यातील वाहन संख्या कमी करणारी आहे. हे माथी भडकती ठेवून आंदोलने करणाऱ्या आंदोलकांना जाणून घेण्यात रस नसतो. आज एसटी जाळली आणि उद्या नवी कोरी एसटी प्रवासी सेवेत आली असे होत नाही. जेव्हा नवीन वाहन खरेदीसाठी निविदा काढली जाणार तेव्हा हा प्रश्न मार्गी लागणार. मात्र प्रत्यक्ष वाहन सेवेत कधी दाखल होईल ? याविषयी अनिश्चितता असते. एसटीच्या सेवेस फायद्यात आणण्यासाठी काय करता येईल ? यासाठी आवश्यक सूचना देणे, बस गाड्यांना हानी पोहोचवणाऱ्यांपासून रक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष साहाय्य करणे आदी माध्यमातून साहाय्य करण्यासाठी प्रयत्न व्हावे. सर्वांसाठी उपयुक्त असलेल्या सार्वजनिक सेवेची प्राधान्याने हानी करणे याला नेमके काय म्हणावे ? स्वतःच्या मालकीच्या वाहनाची अशी हानी करण्याचा कुणी विचारही करणार नाही.रस्त्यावर धावण्यासाठी सुस्थितीतील बस गाड्यांची संख्या अल्प असल्यावर फेऱ्या रहित कराव्या लागतात. बस गाड्या सुस्थितीत येईपर्यंत नागरिकांना हा त्रास प्रतिदिन सोसावाच लागतो. यामुळे विशेषता जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार यांची कुचंबना होते; पण याकडे कुणाचे लक्ष आहे ? 'दुसऱ्याचा विचार करणे' हा भागच लोप पावत आहे. त्यामुळे अविचाराच्या आहारी जाऊन जाळपोळ, तोडफोड केली जात असल्याने परिवहन सेवेतील एकएक बस गाडी सेवेतून आपसूकच बाहेर पडत आहे. वाहन दीर्घकाळ सेवा देऊन तांत्रिक दृष्ट्या नादुरुस्त होत असल्यामुळे सेवेतून निवृत्त होत असेल, हे सूत्र एसटीच्या फार अल्प बस गाड्यांना लागू होत असेल, असे म्हणण्यास वाव आहे. वर्ष २०२३ चे दहा महिने संपले आहेत आणि वर्ष अखेर होण्यास २ महिने उरले आहेत. एसटीच्या बस गाड्यांच्या हानीचा आलेख कमी व्हावा. त्यात अधिक भर न पडो हीच प्रवाशांची इच्छा आहे.अर्थिक नुकसान कुणाकुणाचे? एसटीची आर्थिक स्थिती कायमच डळमळीत राहिली आहे. त्यात सुधारणा करण्यासाठी आर्थिक ताळमेळ साधने जिकरीचे आव्हान आहे. सतत दोलायमान आर्थिक स्थिती असलेल्या एखाद्या आस्थापनेस टाळे लावण्यात येते, हा सर्वसाधारण व्यावसायिक नियम आहे; मात्र एसटी महामंडळाने याही स्थितीत तग धरून राज्यवासियांना सेवा देत सार्वजनिक वाहतूक सेवेस टाळे लागू दिलेले नाही. त्यामुळेच असंख्य एसटी कर्मचाऱ्यांचेही संसार चालू आहेत. हिंसक कृत्ये करणाऱ्यांकडून होत असलेली हानी त्या कर्मचाऱ्यांच्या उपजीविकेचे साधन हिसकावून घेण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असे वाटल्यास चूक ते काय ?हिंसक घटनांत सहभागी असलेलेही परिस्थिती सामान्य झाल्यावर एसटीच्या सेवेचा उपयोग करत असतील; मात्र सार्वजनिक सेवा देणाऱ्या महत्वपूर्ण साधनाची हानी झाल्याने प्रवाशांची वाहतूकविषयक कुचंबणा होतेच, तसेच भविष्यात तिकीट दरवाढीचा भारही बळजबरीने सोसावा लागतो. इंधन दरवाढ, कर्मचाऱ्यांचे वेतन आदी गोष्टींमुळेही तिकीट दरवाढ अनिवार्य होते. मात्र हिंसक घटनांतून होणाऱ्या हानीचा मुद्दा या रांगेतून बाहेर काढणे शक्य न होता अशक्य झाला आहे. दुष्कर्माला शिक्षा हवी गणेशोत्सव, आषाढी एकादशी, विभागीय जत्रा आदी वेळेस महामंडळाकडून जादा बस गाड्या प्रवाशांच्या सेवेत रुजू करण्यात येत असतात. त्यासाठी राज्याच्या विविध आगारांतून बस गाड्या त्या त्या ठिकाणी दाखल होऊन सेवा देत असतात. अर्थातच हे नियोजन व्यापक स्तरावर होत असते. हिंसक घटनांतून बस गाड्यांची हानी होत राहिल्यास प्रवाशांना अतिरिक्त बस सेवा देण्यासाठी बसेस कुठून आणायच्या ? खासगी वाहतूक सेवादार प्रवासी दरात मनमानीपद्धतीने भाडेवाढ करून प्रवाशांची लूट करतात तेव्हा बहुसंख्य प्रवाशी हक्काने 'लाल डब्या'कडेच वळतात. जेष्ठ नागरिकांना, महिलांना प्रवासी भाड्यात सवलत असल्याने ती मंडळी आतुरतेने याच सेवेचा लाभ घेणे पसंत करत असतात. प्रवासास निघाल्यावर ज्या मार्गाने एसटीची बस जाते तोच मार्ग निवडण्याकडे त्यांचा कल असतो. यासाठी त्या प्रवासी मार्गावर ती मंडळी एसटी बस केव्हा येणार, याकडे डोळे लावून बसलेली असतात. एसटीची बस सेवा जेष्ठ नागरिकांसाठी 'प्रवासातील काठी'च आहे. त्या काठीचीच नासधूस करण्यास धजावले तरी कसे जाते ? आपल्याकडून कोणाचे हित साधले जाणार नसेल, तर कोणाचे अहित करण्याचे दुष्कर्म तरी करू नये. दुष्कर्मी वृत्तीच बळावल्याने व्यापक विचारीपणाच धुळीस मिळाला आहे.महाराष्ट्राची जीवनवाहिनी ठरलेल्या एसटीची हानी करण्यासाठी आंदोलन, बंद आणि मोर्चा यांच्या वेळी बहुसंख्येने जमाव असतो; मात्र हानी झालेल्या बस गाड्यांची दुरुस्ती करण्यासाठी यांपैकी कुणीही नसते. दुरुस्तीतील सहभाग वाढवण्यासाठी आणि आपण तोडफोड, जाळपोळ केलेल्या गोष्टी जोडणे किती कठीण आहे, हे समजण्यासाठी हानीकर्त्यांकडूनच महामंडळाच्या वर्कशॉपमधून शिक्षा म्हणून विनामूल्यपणे काम का करून घेऊ नये ? आर्थिक हानी भरपाईचे सूत्र पुढे आल्यावर काखा वर केल्या जातात. त्यामुळे उपरोक्त शिक्षा करण्याविषयी राज्य सरकारने गांभीर्याने विचार करावा !

'आशां'च्या आंदोलनाकडे मात्र दुर्लक्ष?

'आशा गटप्रवर्तक' त्यांच्या समकक्ष सरकारी कंत्राटी कर्मचाऱ्याइतकेच काम करतात. मग त्यांच्याबाबतीत हा दुजाभाव का? डॉ. नितीन जाधव महाराष्ट्रात राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कार्यरत असलेल्या 'आशा गटप्रवर्तकां'चे १८ ऑक्टोबरपासून राज्यभर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू आहे. पण दुर्दैवाने त्यांच्या मागण्या ऐकून घेण्यासाठीदेखील आपल्या राज्यकर्त्यांना वेळ मिळालेला नाही. आरोग्यमंत्री 'सरकार आपल्या दारी' योजनेच्या प्रचाराच्या दौऱ्यात व्यग्र होते. पण सरकारच्याच आरोग्य योजना गावागावांत लोकांपर्यंत अत्यंत निष्ठेने पोहोचवण्याचे काम करणाऱ्या आशा गटप्रवर्तकांचे प्रश्न समजून घ्यायला ते आले नाहीत. राज्यातल्या मुख्य प्रसारमाध्यमांनी या आंदोलनाच्या दिलेल्या बातम्या पाहता त्यांनादेखील आशांचे प्रश्न महत्त्वाचे वाटले नाहीत की सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे प्रसारमाध्यमांचा धरणे/आंदोलनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे, असा प्रश्न पडतो. कोण आहेत आशा गटप्रवर्तक? राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे आशा स्वयंसेविका योजना! सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणा, सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये, आरोग्यासंदर्भात जागरूकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन निर्माण करण्याच्या दृष्टीने 'आशा स्वयंसेविका' महत्त्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहे. 'आशा' ही स्थानिक रहिवासी व तिला स्थानिक भाषा अवगत असल्याने गावाच्या आरोग्यविषयक अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी आशा स्वयंसेविकेकडून महत्त्वपूर्ण योगदान दिले जाते. राज्यातील १५ आदिवासी व ३१ बिगरआदिवासी जिल्ह्यांत आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत.आशा स्वयंसेविकेच्या कार्यप्रणालीस गती येणे, कार्याचे मूल्यांकन, व्यवस्थापन यासाठी साधारणत: २० आशा स्वयंसेविकांसाठी एका 'आशा गटप्रवर्तकाची' नेमणूक करण्यात आली आहे. गटप्रवर्तकांना त्यांच्या जॉब चार्टनुसार, २० दिवस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या (पीएचसी)च्या कार्यक्षेत्रात दौरे करून पाच दिवसांत आशांनी केलेल्या कामाचा अहवाल तयार करून वरिष्ठांना सादर करावा लागतो. दौऱ्यादरम्यान गटप्रवर्तकांना आशांना भेटी, मार्गदर्शन, त्यांच्या कामावर देखरेख ही कामे म्हणजेच 'सुपरवायझर' व 'कारकून' अशी दोन्ही कामे करावी लागतात. सध्या महाराष्ट्रामध्ये ३५०० पेक्षाही जास्त गटप्रवर्तक कार्यरत आहेत. बहुतांश गटप्रवर्तक १२ वी ते पदवीधर असून, त्या कुशल कर्मचारी या वर्गात मोडतात. गेल्या १८ वर्षांपासून एनएचएममध्ये गटप्रवर्तक दररोज आठ तासांपेक्षाही जास्त वेळ काम करीत आहेत. त्यांच्या जॉब चार्टव्यतिरिक्त आरोग्य अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली कामेही त्यांच्याकडून सक्तीने करवून घेतली जातात.शासकीय कर्मचारी की कंत्राटी ? देशात २००५ पासून 'राष्ट्रीय आरोग्य अभियान' सुरु आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ४७ नुसार, राज्य सरकारने० लोकांना सेवा पुरवण्याच्या अनुषंगाने आरोग्य अभियान हा एक वैधानिक कार्यक्रम आहे. याचाच अर्थ असा की, या मिशनमधील सगळी पदे राज्यघटनेनुसार वैधानिक आहेत. तसेच 'पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२' या सामाजिक सुरक्षा कल्याण कायद्यानुसार, कोणत्याही प्रकारच्या सरकारी, निम-सरकारी किंवा खासगी दुकान/ संस्थेमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी नोकरी करत असतील तर त्यास आस्थापना म्हटले जाते. अशा व्यक्तींना १९७२ च्या कायद्याचे लाभ मिळणे हा त्यांचा हक्क आहे.या अभियानामधील कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरले गेले असून त्यांना ११ महिन्यांची ऑर्डर दिली जाते. नंतर दोन दिवस ब्रेक देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीनुसार त्यांची पुनर्नियुक्ती केली जाते. गटप्रवर्तकांची नियुक्तीदेखील याच पद्धतीने केली जाते. त्यामुळे त्यांनाही कंत्राटी कामगाराचे सर्व लाभ मिळायला हवेत. पण दुर्दैवाने आशा गटप्रवर्तकांना राज्य सरकार कंत्राटी कर्मचाऱ्यांचे लाभ द्यायला तयार नाही.५ ऑक्टोबर २०२० रोजीच्या शासन आदेशानुसार, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे सुसूत्रीकरण करून त्यांना नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, एनएचएममधील 'डेटा एंट्री ऑपरेटर' या कंत्राटी कर्मचाऱ्याला दरमहा रु. १८०००/- इतके वेतन मिळते. हे काम कारकुनी पद्धतीचे आहे. गटप्रवर्तकांचे कामही कारकुनी पद्धतीचे व देखरेखीचे असूनही शासन गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचारी मानत नाही आणि त्यामुळे त्यांना कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन लागू करण्यात आलेले नाही.३ फेब्रुवारी २०२२ च्या आदेशानुसार, कंत्राटी कर्मचाऱ्यांना ५% वार्षिक वेतनवाढ व १५% अनुभव बोनस (ड्रूेरश्रीं इेर्पीी) देण्यास शासनाने सुरुवात केली आहे. हा आदेश गटप्रवर्तकांना लागू करण्यात आला नसून त्यांना मिळणारे मानधन कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनापेक्षा खूप कमी आहे. एकाच क्षेत्रात समान काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी तफावत ठेवणे योग्य नाही. १८ ऑगस्ट २०२३ रोजी आरोग्यमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत 'कायम' करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु त्यात आशा गटप्रवर्तकांचा समावेश करण्यात आला नाही.राज्य सरकारच्या मते, गट प्रवर्तक या मानधनावर काम करणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. त्यांचे काम पूर्णवेळ नसून त्यांना सांगितले तेवढे काम आणि तेवढ्याच कामाचे मानधन मिळणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्षात गट प्रवर्तकांना पडेल ते काम करावे लागते. राज्य सरकार त्यांच्याकडून कर्मचाऱ्यासारखी कामे करून घेते आणि वेतन/मानधन देताना ते 'कर्मचारी'च नाहीत असे छातीठोकपणे सांगते. ही सरकारची दुटप्पी भूमिका योग्य नाही. त्यामुळे आशा गट प्रवर्तकांना 'शासकीय कर्मचारी' दर्जा द्यावा, आणि तो जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत त्यांना कमीत कमी 'कंत्राटी कर्मचारी' म्हणून वेतन व सामाजिक सुरक्षा देण्यात यावी, अशी ठोस आणि रास्त मागणी या आंदोलनात करण्यात आली आहे.गट प्रवर्तकांच्या अन्य मागण्या आशांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यांना भेटी देणे, अशी कामे गट प्रवर्तक करतात. ही सर्व कामे देखरेखीची आहेत. 'गट प्रवर्तक' हा शब्द सर्वसामान्यांना समजण्यासाठी कठीण आहे. तेव्हा गट प्रवर्तकांना त्याऐवजी 'आशा सुपरवायझर' हे नाव देण्यात यावे. गट प्रवर्तकांना ऑनलाइन माहिती भरण्याची कामे सांगण्यात येतात. त्यासाठी त्यांना स्वत:चाच मोबाइल वापरावा लागतो. त्यांच्याकडे स्मार्टफोन नसेल तर त्यांना माहिती भरणे शक्य होत नाही. त्यामुळे शासकीय कामे करण्यासाठी त्यांना शासनाकडून स्मार्टफोन देण्यात यावा.गट प्रवर्तकांना डेटा एन्ट्रीकरिता प्रतिदिन रु. ५० याप्रमाणे पाच दिवसांकरिता दरमहा रु. २५० दिले जात होते. सध्या आशा सॉफ्टवेअर बंद असल्याचे कारण पुढे करून हा मोबदला बंद आहे. पण ते बंद असले तरी गट प्रवर्तकांना इतर कामांचे रिपोर्टिंग करावेच लागते. तेव्हा गट प्रवर्तकांना हा मोबदला पूर्ववत सुरू करण्यात यावा. आता डेटा पॅक रिचार्जसाठी जास्त पैसे लागत नाहीत, मग ही काय क्षुल्लक मागणी असे एखाद्याला वाटू शकते. पण मोठय़ा प्रमाणात आणि रोज माहिती ॲपमध्ये भरण्यासाठी तितक्याच प्रमाणात डेटा पॅक रोज रिचार्ज करण्यासाठी त्यांनी पैसे आणायचे कुठून?आरोग्यवर्धिनी या कार्यक्रमामध्ये गट प्रवर्तकांचा समावेश केलेला नाही. परंतु या कार्यक्रमांअंतर्गत आशांनी केलेल्या कामाचे रिपोर्टिंग गट प्रवर्तकांना करायला सांगितले जाते. त्यामुळे आरोग्यवर्धिनी कार्यक्रमात गट प्रवर्तकांना ठोस जबाबदारी देण्यात यावी आणि त्याचा मोबदलाही देण्यात यावा.सरकारचे उत्तर वर म्हटल्याप्रमाणे, आरोग्य मंत्रालयाने राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सह-संचालकांकरवी या आंदोलनाची दखल घेतली, हेही नसे थोडके! त्यांनी शिष्टमंडळाच्या मागण्या ऐकून घेतल्या. त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रश्नावर निर्णयही घेतले. गट प्रवर्तकांच्या पदाला कोणता दर्जा द्यायचा, हा धोरणात्मक प्रश्न असून त्यासाठी आरोग्यमंत्री आणि आरोग्य आयुक्त तथा अभियान संचालक यांच्याबरोबर वेगळी बैठक घेण्याचे आश्वासन दिले. आरोग्यवर्धिनीमध्ये गट प्रवर्तकांचे काम महत्त्वाचे असून त्यांना त्यांच्या कामाचा दर महिना रु. १५००/- इतका मोबदला देण्यात येईल. 'आशा गट प्रवर्तक' ऐवजी 'आशा सुपरवायझर' असे नाव करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्यात येईल.या पद्धतीने आंदोलनामुळे सरकार दरबारी काही सकारात्मक निर्णय झाले असले, तरी राज्य सरकार आणि आरोग्य मंत्रालय 'आशा आणि गट प्रवर्तक' यांच्या प्रश्नांकडे किती गांभीर्याने बघत आले आहे आणि पुढे बघेल, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. हे फक्त यांचे प्रश्न नसून गावपातळीवर काम करणाऱ्या सगळय़ाच क्षेत्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न आहेत. कारण राज्य सरकारने नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे, सगळय़ाच सार्वजनिक क्षेत्रात कंत्राटी पद्धतीने पदभरती केली जाणार आहे. आतापर्यंत कामगार संघटनांना सरकारकडे जाऊन जाब तरी विचारता येत असे. यापुढच्या काळात सगळय़ा गोष्टी खासगी कंपन्यांच्या हातात गेल्यावर कोणाला जाब विचारणार? त्याची किती दखल घेतली जाणार? आज हे प्रश्न या कर्मचाऱ्यांपुरते आहेत, पण भविष्यात त्यांची झळ सामान्यांपर्यंत पोहोचल्याशिवाय राहणार नाही. तेव्हाचे काय?

सरकार,पोलीस आणि आंदोलनजीवी संघर्षाचा त्रिकोण

सरकार आदेश देणार पोलीस अंमलबजावणी करणार आणि आंदोलनजीवी नागरिक संघर्ष करणार. सध्या आपल्या देशात हेच चालू आहे.त्यात कोणालाच कोणाची सामाजिक बांधिलकी नाही. सर्वच सरकारी खाते हे खाते आहेत.सरकारी कर्मचारी अधिकारी हे राजकीय नेत्यांची गुलामी स्वीकारून देशातील नागरिकांचे आर्थिक शोषण करीत असतात.सरकार म्हणजे कोण राजकीय पक्षांचे सत्ताधारी नेते भांडवलदारांच्या फायद्यासाठी योजना,बिल बनविणार त्यांची अंमलबजावणी प्रशासकीय कर्मचारी अधिकारी पोलीस करणार. सरकारच्या धोरणाला विरोध कोण करणार?. कामगार,शेतकरी,शेतमजूर म्हणजेच आंदोलनजीवी नागरिक. मोर्चे आंदोलने करणाऱ्यावर पोलीस त्यांच्यावर बळाचा वापर करणार आणि आदेशाचे पालन करणार.प्रत्येक नेता आणि शासकीय कर्मचारी अधिकारी नागरिकांचे वेगवेगळा पद्धतीने आर्थिक शोषण करणार आणि सांगणार सरकारचा आदेश आहे.आम्ही काय करणार?. सरकारच्या कोणत्याही खात्यात जा चिरीमिरी दिल्या शिवाय काम होत नाही.नाहीतर एक नाही अनेक चुका काढल्या जातात. मग कार्यालयात चकरा माराव्या लागतात.त्यामुळे एक तर रोजगार बुडतो आणि येण्याजाण्याचा प्रवास खर्च चहा पाणी जेवणाचा खर्च हा आलाच.तो करण्यापेक्षा चिरीमिरी देणेच सोयीस्कर परवडते. हाच सर्व नागरिकांना सरकारी खात्याचा अनुभव आला असेल. म्हणूनच सरकारी खाते हे खातेच असते.त्यांचे मालक प्रशासकीय अधिकारी कर्मचारी असतात.एकटा दुकटा नागरिक संघर्ष करू शकत नाही.त्यासाठी प्रत्येक खात्यातील लाभार्थीची एकजूट म्हणजेच संघटना असायला पाहिजे.आणि ती कोणत्याही राजकीय पक्षाच्या दबावाखाली नसावी.स्वतंत्र विचारांची असावी.राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली संघटीत झालेल्या कामगारांना,शेतकऱ्यांना ,शेतमजुरांना न्याय हक्क मिळतो हे गिरणी कामगारांनी,शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे.मी असंघटीत नाका कामगारांना संघटीत करून त्यांना न्याय हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी १९८२ पासून काम करत आलो तेव्हा कायदा नव्हता म्हणून नाका कामगार,इमारत बांधकाम कामगार यांची नांव नोंदणी होत नव्हती आता १ ऑगस्ट १९९६ साली इमारत बांधकाम कामगार व इतर कामगार सेवा शर्ती कायदा मंजूर झाल्यावर २००७ पासून त्यांचे कल्याणकारी महामंडळ बनविण्यात आले.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकार कायदा १९९६,इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकार अधिनियम १९९८,इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) कायदा १९९६,इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) केंद्रीय अधिनियम १९९८, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम २००७.बांधकाम व इतर बांधकाम कामगार हे सर्वात मोठया असंघटित वर्गात येतात. कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तींचे नियमन करण्याच्या उद्देशानें तसेच सुरक्षा,आरोग्य व कल्याणासाठीच्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीने,भारत सरकारने इमारत व इतर बांधकाम कामगार(रोजगार व सेवाशर्ती नियमन) कायदा १९९६ ची तरतूद केली आहे.या कायद्याअंतर्गत राज्य सरकारने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्तीचे नियमन) २००७ देखील मंजूर केले.ह्या कायद्यान्वये महाराष्ट्र शासनानेसुद्धा महाराष्ट्र बांधकाम व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम पारित केला. ह्या अधिसूचनेनुसार सुरवातीस महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना ५ शासन प्रतिनिधी नेमून करण्यात आली होती.अधिनियम २०११,२०१५ व २०१८ नुसार मंडळाची पुनर्रचना करण्यात आली व त्रिपक्षीय मंडळ स्थापन करण्यात आले. मंडळात अध्यक्ष तसेच शासन, मालक व कामगार ह्यांचे प्रत्येकी ३ प्रतिनिधी मंडळात घेण्यात घेण्यात आले पाहिजे असतात.पण गेले कितेक वर्ष मंडळावर कामगार प्रतिनिधी नाही.याबाबत अनेक कामगार संघटनेनी आंदोलनात मांगणी केली असतात.युती,आघाडीच्या दोन तीन इंजेन असलेल्या सरकारची याबाबत एक मत होत नाही. माननीय देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महामंडळाला ओमप्रकाश यादव अध्यक्ष लाभले होते,आर एस एस भाजप प्रणीत संघ शाखेचे निष्टावंत कार्यकर्त्यांना बक्षिशी म्हणून कामगार संघटनेचे प्रतिनिधी मंडळावर घेण्यात आले होते.नियम ३५ (१) नुसार मंडळाचा कार्यकाळ ३ वर्षाचा आहे.२०१४ नंतर त्याला हरताळ फसला गेला.मंडळाचा मुख्य उद्देश हा विविध योजनांद्वारे असंघटीत इमारत व इतर बांधकाम कामगारांना सुरक्षा तसेच आरोग्य व इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. पण नांव नोंदणी होत नसल्यामुळे लाखो असंघटीत कामगार या कल्याणकारी योजनेचा लाभ घेण्यपासून वंचित आहेत. लाखोच्या नव्हे ९३ टक्के असंघटीत कामगार असून सुद्धा ते संघटीत नसल्यामुळे वंचित आहेत.जातीचे नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांना नेत्यांना या असंघटीत कामगारांचे काही घेणेदेणे नाही.शंकर पुजारी,सागर तायडे,सुरेश पाटील,मधुकांत पथारिया,प्रदीप शिंदे,राजकुमार होळीकर,प्रशांत रामटेके,प्रशांत मेश्राम,कालिदास रोटे,रविंद्र सूर्यवंशी अशी काही आंदोलनजीवी कार्यकर्ते नेते वेळोवेळी तालुका जिल्हा ते राज्य पातळीवर जन आंदोलन मोर्चे,धरणे करीत असतात.प्रत्येक ठिकाणी सरकार नावाचे पात्र बाजूला राहते आणि संघर्ष हा प्रशासकीय अधिकारी आणि पोलीस यांच्याशी होत असतो.म्हणूनच सरकार, पोलीस आणि आंदोलनजीवी संघर्षाचा त्रिकोण काही थाबंत नाही.

असंघटीत नाका कामगार आणि इमारत व इतर कामगार यांना नांव नोंदणी साठी सर्व प्रकारची कागदपत्रे तयार केल्यावर ही कामगारांची नांव नोंदणी होत नाही.९० दिवसाचे प्रमाणपत्र उपलब्द करून घेण्यासाठी खूप प्रयत्न करावा लागतो.खाजगी ठेकेदार,शासकीय ठेकेदार प्रमाणपत्र देत नाही.दररोज मालक व जागा बदली होते.एक दिवस ज्यांच्या घरी दुरस्तीचे काम केले यांना नांव नंबर सही मांगीतली तर सहजासहजी देत नाही. प्रत्येकाला इन्कमटॅक्स,पालिका परवानगी असे कोणते ही मुद्दे उपस्थित करून प्रशासकीय यंत्रणा अडचणीत अणु शकते अशी भीती नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांना वाटत असते. तो पण शासकीय अडचणी कशा निर्माण केल्या जातात यांचा अनुभवी असतो.या दररोजच्या काम करून पोटभरनाऱ्या नाका कामगारांना तेवढा दररोज संघर्ष करण्यासाठी वेळ नाही.म्हणूनच ९० दिवसाचे प्रमाणपत्र उपलब्द होत नाही.आणि कामगारांची नांव नोंदणी होत नाही.यासाठीच प्रत्येक तालुका जिल्ह्यात इमारत बांधकाम कामगार नाका कामगारांच्या विविध संघटना मोर्चेबांधणी करून आंदोलनजीवी बनत असतात.म्हणूनच सरकार,पोलीस आणि आंदोलनजीवी संघर्षाचा त्रिकोण कमी होण्या येवजी वाढत असतो. सरकार नावाचे पात्र गेंड्याच्या कातडीने बनलेले असते.यामुळेच प्रशासकीय यंत्रणा ते आपल्या सोयीनुसार प्रत्येक वेळी वापरत असते.कामगार,शेतकरी शेतमजूर किंवा कोणता ही नागरिक हा अन्याय अत्याचार झाला तरच सनद शीर मार्गाने प्रथम पत्रव्यवहार करून न्याय मागतो नाही मिळाल्यास उपोषण,धरणे आंदोलन करून आंदोलनजीवी

स्वतंत्र मजदूर युनियन
पदोन्नतीमधिल आरक्षण लागू करण्यासह संघटीत व असंघटीत कामगारांच्या महत्त्वपूर्ण मागण्यांच्या सोडवणुकीसाठी
विधानसभेच्या नागपूर हिवाळी अधिवेशनावर
प्रचंड मोर्चा
स्वतंत्र मजदूर युनियन यांचे नेतृत्वात
पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष-स्वतंत्र मजदूर युनियन
यशवंत स्टेडियम, नागपूर येथून

बनतो.तेव्हा सरकार नांवाचे पात्र कधीच समोर नसते असतात ते पोलीस.पोलीस प्रशासकीय अधिकारी वर्गाच्या कानावर या घटना सांगतात.तेव्हा सामाजिक बांधिलकी विसरून प्रशासकीय सेवेचा गर्व असलेला अधिकारी बिनडोक मंत्र्याकडे म्हणजेच सरकार कडे बोट दाखवते.नीतिमत्ता विकून लोकलज्जा सोडून हे कायदे कानून मोडून बनलेले हे सरकार कोणतीच घटना गांभीर्य घेत नाही.म्हणूनच सरकार,पोलीस आणि आंदोलनजीवी संघर्षाचा त्रिकोण वाढत असतो.म्हणूनच त्रिकोणी संघर्ष टाळावा.राजकारणी राज्यकर्ते आणि सर्वच खात्याचे कर्मचारी अधिकारी नागरिकांचे ग्राहकांचे वरबोट दाखवून आर्थिक शोषण ते संघटीतपणे करीत असतात. म्हणूनच आपण असंघटीत कामगार,नाका कामगार,शेतकरी,शेतमजूर सर्व क्षेत्रातील असंघटीतांनी ही संघटीत झाले पाहिजे. घटनाकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन मागितल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही संघटीत होऊन संघर्ष केला तर यशस्वी होता येतो. म्हणूनच संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि आंदोलनजीवी संघर्ष पत्र व्यवहार करून टाळावा.नसेल तर शक्ती प्रदर्शन आवश्यक आहेच.

सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,भांडूप मुंबई.
अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्र राज्य

विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्ट्याचा लाभ घ्यावा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई

महात्मा बसेश्वर महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र द्वारा करिअर कट्ट्याचे उद्घाटन

लातूर :- येथील महात्मा बसेश्वर महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्ट्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, आयएएस आपल्या भेटीला समन्वयक डॉ. मनोहर चपळे, उद्योजक आपल्या भेटीला समन्वयक डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. मारुती माळी आणि प्रा. शंकर भोसले यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, करिअर कट्ट्यातर्गत आयएएस व उद्योजक आपल्या भेटीला, भारतीय संविधानाचे पारायण, वृत्तवेध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी, फाउंडेशन कोर्स-स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी, सायबर सेक्युरिटी कोर्स-तांत्रिक शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आणि ई-फाइलिंग वाणिज्य कोर्स शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आहेत याचा आपण सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. यावेळी आयएएस आपल्या भेटीला समन्वयक डॉ. मनोहर चपळे, उद्योजक आपल्या भेटीला समन्वयक डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी होत्या.

वेडिंग प्लॅनर बनायचं आहे? हे ॲप डाऊनलोड करा आणि मिनिटांत शिकून घ्या

आजकाल नोट्स बनवण्यासाठी पेन आणि कागद घेऊन जाणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. प्रत्येकाला आपल्या फोनमध्ये यादी वगैरे ठेवायला आवडते. बरं, हे देखील खरं आहे की पूर्वीच्या लोकांप्रमाणे कागदपत्रांचा सांभाळ करणं कठीण असतं. अनेक वेळा ते हरवण्याची भीती असते किंवा त्यांना नेहमी सोबत ठेवणं शक्य नसतं. अशा परिस्थितीत लोक संपूर्ण यादी फोनच्या नोट्समध्ये ठेवतात.वेडिंग प्लॅनर होणं म्हणजे अशा प्रकारची भली मोठी यादी सांभाळणं. जर तुम्ही या वेडिंग सीझनमध्ये वेडिंग प्लॅनर होण्याचा विचार करत असाल तर आज आम्ही तुम्हाला अशा काही ॲप्सबद्दल सांगणार आहोत जे तुम्हाला खूप मदत करू शकतील. यामध्ये तुम्ही तुमची सर्वात मोठी यादी एकाच ठिकाणी सेव्ह करू शकाल.थशववळपस झश्ररपपशी लू चूथशव हे वेडिंग प्लॅनर ॲप वापरल्याने तुमचे बरेच काम सोपे होऊ शकते. तुम्ही तुमची सर्व कामं या ॲपमध्ये करू शकता - तुम्ही लोकांची यादी तयार करू शकता, महत्त्वाच्या कामांचा मागोवा ठेवू शकता, खर्च लिहू शकता आणि विक्रेते व्यवस्थापित करू शकता. हे ॲप त्रेसश्रश झश्ररू डीश वर असून ५००घ लोकांनी डाऊनलोड केलं आहे. याला प्लॅटफॉर्मवर ४.१ रेटिंग आहे.थशववळपस झश्ररपपशी लू द्धश घर्पी १ दशलक्षाहून अधिक लोकांनी हे प डाऊनलोड केलं आहे.

त्रेसश्रश झश्ररू डीश वर त्याचं रेटिंग ४.८ आहे. म्हणजेच हे ॲप अनेक युजर्सचे आवडतं ॲप आहे. या ॲपद्वारे तुम्ही लग्न पूर्णपणे मॅनेज करू शकता. येथे तुम्हाला आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट सहज मिळेल.या ॲपद्वारे तुम्ही तुमच्या लग्नाचे उत्तमरित्या नियोजन करू शकता. गुगल प्ले स्टोअरवर आतापर्यंत या ॲपचे १० लाखांहून अधिक युजर्स आहेत.

आयुर्वेदाच्या स्मृतीतून: जीवनावश्यक मीठ

आयुर्वेद कोणत्याही एकाच मिठाला अथवा एकांगी विचाराला थारा देत नाही. गरजेनुसार व व्याधीनुसार आयुर्वेदात वेगवेगळ्या मिठाचा प्रकार व उपयोग केलेला आढळून येतो. मागील सदरात आपण मीठ आणि थायरॉइडचा संबंध पहिला होता. मात्र बऱ्याचदा आयुर्वेदाला कोणते मीठ अपेक्षित आहे याबद्दल बऱ्याच जणांना प्रश्न पडलेला असतो. कारण मीठ हा सर्व रसांचा राजा आहे. त्याच्याशिवाय अन्नाला चव येणे शक्य नाही. मीठ खारट असले तरी गुजरातीत मिठाला ‘मीठू’ असे म्हणतात. हिंदीत त्याला ‘सबरस’ असे म्हणतात. समुद्राचे खारे पाणी समुद्रकिनारी वाफे बनवून त्यात साठवले जाते व सूर्याच्या उष्णतेने हे पाणी सुकून जाते आणि मीठ बनते. सध्या जगामध्ये हेच मीठ जास्त वापरले जाते. तसेच खाणीतूनही मीठ निघते त्याला सैंधव असे म्हणतात.आयुर्वेदात हे श्रेष्ठ मीठ सांगितले आहे. आयुर्वेदात ‘लवण रस’मध्ये प्रमुख पाच प्रकार सांगितले आहेत. यास ‘पंचलवण’ असे म्हणतात. सैंधेलोण, पादेलोण, बीडलवण, सौवर्चल व सामुद्रलवण असे. पैकी सैंधव लवण हे इतर लवणांपेक्षा सौम्य आहे त्यामुळे आहारात मीठ वर्ज्य करावयाचे झाल्यास तसेच रक्तदाब वाढला असल्यास सैंधवचा वापर करतात. आयुर्वेदात सैंधव मिठाचे महत्त्व फार आहे. मोठ्या मिठाचे म्हणजे समुद्रापासून मिळणाऱ्या मिठाचेही अनेक उपयोग आहेत. कारण या मिठाचे कातडी कमावण्याच्या व्यवसायापासून ते रस्त्यावरील बर्फ वितळून रस्ता मोकळा करण्यापर्यंत वापर होतो. मोठमोठ्या मसाल्याच्या, चिप्स, वेफर्स, सॉस इत्यादी पदार्थाच्या निर्माण प्रक्रियेमध्ये याच मोठ्या मिठाचा वापर फार मोठ्या प्रमाणात होतो. एवढेच काय पण घरात साधं लोणचं लावायचं असेल तरी हेच मीठ वापरलं जातं. यावरून तुम्हाला त्याच्या विविध उपयोगाचा तर अंदाज आलाच असेल. तर हे तेच मोठे मीठ ज्याबद्दल मी बोलत आहे. सध्या यात कृत्रिमरीत्या आयोडिन घातल्याने बऱ्याचदा त्याची नैसर्गिक चव व गुणधर्महीबदलतात. त्यामुळे आयुर्वेद कोणत्याही एकाच मिठाला अथवा एकांगी विचाराला थारा देत नाही. गरजेनुसार व व्याधीनुसार आयुर्वेदात वेगवेगळ्या मिठाचा प्रकार व उपयोग केलेला आढळून येतो. यावरून आपले आचार्य व आपल्या परंपरा किती प्रगत होत्या हेच अधोरेखित होत आहे. या मोठ्या मिठाचा खडा जिभेवर ठेवून बघा. गेलेली रुची परत येते. काहीही खाण्याची इच्छा नसेल तर खावेसे वाटते. अन्नाला चव येते.मीठ नसेल तर अन्न बेचव होते. दुखणाऱ्या भागावर आमची आज्जी या मोठ्या मिठाचे खडे तव्यावर गरम करून कापडात बांधून त्याचा शेक द्यायची. दुखणं पटकन थांबायचं. याच मोठ्या मिठाचा खडा दाढ दुखत असली की त्या दाढेत धरून ठेवला की दाढदुखी पटकन थांबायची. काही लोक पूर्वीच्या काळी हे मीठ व हळद एकत्र करून दात घासायचे. हे उत्तम कीटाणूनाशक आहे. तुम्ही स्वत: खरंच एकदा तरी हळद मिठाने दात घासून पाहा. पूर्ण मुखातून लालास्राव सुरू होतो, जिभेवरचा पांढरा थर जातो. दातांचे आरोग्य वाढते. प्रत्येक चित्रपटात पूर्वी याच मोठ्या मिठाच्या पाण्याच्या पट्ट्या तयार करून ताप आलेल्या व्यक्तीच्या कपाळावर ताप कमी करण्यासाठी, तो डोक्यात जाऊ नये यासाठी वापरल्या जायच्या.कोमट मिठाच्या पाण्याने आंघोळ केली की, कणकण जाते, अंग मोकळे होते, अंगदुखी थांबते. ओवा व मीठ वाटून चूर्ण घेतल्यास पोटदुखी लगेच थांबते. मिठाबरोबर मिरे वाटून खाल्ले तर उलटी बंद होते. जुलाब सुरू झाल्यास हेच मीठ आणि लिंबू पाणी एकत्र करून दिले जाते. हे मीठ घेतले नाही तर अशक्तपणा जाणवतो. हाडे ठिसूळ होतात. काहींना रात्रीअपरात्री पायांना गोळे येतात. पिंड्या दुखू लागतात. या उलट मीठ जास्त घेतले तर केस गळू लागतात. केस पांढरे होतात. चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. सतत नेत्रविकार मागे लागतात, रांजणवाड्या उठतात. मिठाचे आहारातील प्रमाण जास्त झाल्यास पचन बिघडते व पित्त वाढून आमशयाचा दाह होतो. पण या मिठाशिवाय माणसाचे जगणे अवघड आहे. कारण मीठ ही एक जीवनावश्यक वस्तू आहे.

स्वच्छ कसा करायचा हा प्रश्न पडलाय? मग या टीप्स येतील कामी

मुली किंवा एकंदर महिला वर्गाला नटण्या थटण्याची मोठी हौस असते. खास करून मेकअप करण्यासाठी महिलांना किंवा मुलींना कोणत्याही निमित्ताची आवश्यकता नसते. अलिकडे तर डेलीवेअर मेकअप, ब्रायडल मेकअप, ऑफिस मेकअप किंवा कॉलेज किंवा साध्या भेटी गाठींसाठी सिंपल मेकअप असे मेकअपचे चरज्ञर्शी वेगवेगळे प्रकार आणि ट्रेंड ढीशपवी पाहायला मिळत आहेत. सोशल मीडियावरही ङेललरश्र चशवळर मेकअपच्या विविध ट्यूटोरियल चांगल्याच व्हायरल होतात. या रिल्सच्या मदतीने कमीत कमी प्रोडक्टमध्ये झटपट मेकअप चरज्ञर्शी किरणं अनेक जणी शिकल्या असतील. कोणताही मेकअप करत असताना साधारणपणे पावडर आणि कंन्सिलर किंवा फाऊंडेशनचा मुख्य वापर केला जातो.मेकअप करत असताना सुंदर दिसण्यासोबतच त्वचेची काळजी घेणं ङ्ग्ळप उरीशअत्यंत गरजेचं आहे. अनेकजणी मेकअपसाठी चांगल्या प्रतीचे किंवा ब्रॅण्डचे प्रोडक्ट वापरतात. चेहऱ्यासाठी लावण्यात येणाऱ्या पावडर आणि कंन्सिलरसोबतच ते लावण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ब्रशची स्वच्छता राखणं अत्यंत गरजेचं आहे.तुम्ही वेळोवेळी ब्रथ किंवा ब्युटी ब्लेंडर स्वच्छ करत नसाल तर तुमच्या चेहऱ्यावर ॲलर्जी -श्रशीसू किंवा इन्फेक्शन तसंच पिंपल्स येणाची शक्यता वाढते. यासाठी काही सोप्या ट्रिक्स वापरून तुम्ही ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर स्वच्छ ठेवू शकता.असे स्वच्छ करा मेकअप ब्रश आणि ब्यूटी ब्लेंडर जर तुम्ही दररोज मेकअप करत असाल तर किमान दर आठवड्याला ब्रश स्वच्छ करणं गरजेचं आहे. तसंच जर तुम्हाला घाम येत असेल किंवा तुमची त्वचा तेलकट असेल आणि तुम्ही दिवसातून १-२ वेळा मेकअप ब्रश आणि ब्लेंडर वापरत असाल तर तुम्ही तर दोन दिवसांनी थेट वाहत्या पाण्याखाली ब्रश धुवू शकता. आणि ब्यूटी ब्लेंडर स्वच्छ करण्यासाठी तुम्ही घरातील एखाद्या सौम्य शॅम्पूचा वापर करू शकता. यासाठी एका खोलगट भांड्यात पाणी घ्या त्यात १ चमचा शॅम्पू टाका. या मिश्रणात ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर १० मिनिटांसाठी पाण्यात राहू द्या. त्यानंतर वाहत्या पाण्याखाली हलक्या हाताने ब्रश स्वच्छ धुवा.हे देखिल वाचा- मेकअप ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर स्वच्छ करण्यासाठी एका मोठ्या भांड्यात कोमट पाणी घ्या. यामध्ये १ चमचा शॅम्पू आणि बेकिंग सोडा टाकून या मिश्रणात अर्धा तासासाठी ब्रश आणि ब्लेंडर भिजत ठेवा. त्यानंतर ३-४ वेळा स्वच्छ पाण्याने ते धुवा.मेकअप ब्रश स्वच्छ करण्यासाठी एका ग्लासमध्ये कोमट पाणी घ्या. यामध्ये १ चमचा लिक्विड डिटर्जंट आणि १ चमचा व्हाइट विनेगर टाका. आता या मिश्रणामध्ये ब्रश आणि ब्यूटी ब्लेंडर २० मिनिटांसाठी राहू द्या. त्यानंतर नळाखाली ब्रश आणि ब्लेंडर स्वच्छ धुवा.स्वच्छ केलेल्या चरज्ञर्शी ऌीीह आणि ब्यूटी ब्रेंडरची अशी घ्या काळजी ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर धुवून झाल्यानंतर ते टिश्यू पेपरच्या मदतीने कोरडे करा. त्यानंतर पंख्याखाली किंवा हवेवर ते पूर्णपणे कोरडे होवू द्या. त्यानंतरच त्याचा वापर करा. मेकअप ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर ठेवण्यासाठी कायम एखादं वेगळं पाऊच वापरा किंवा तुमच्या मेकअप किटच्या एखाद्या वेगळ्या कप्प्यामध्ये ते ठेवा जेणे करून ते स्वच्छ राहतील.तसंच ब्रश किंवा ब्लेंडरचा वापर केल्यानंतर जर लगेचच ते टिश्यू पेपरने पुसले तर जास्त काळ स्वच्छ राहण्यास मदत होते. अशा प्रकारे नियमित मेकअप ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर स्वच्छ ठेवत असाल तर दररोज मेकअप करूनही तुमची त्वचा चांगली राहण्यास मदत होईल.

स्वच्छता
मे-अप ब्रशची

मेडिटेशन कसे करावे? सोपी आणि योग्य पद्धत जाणून घ्या

मेडिटेशन
करण्याचे
चमत्कारिक
फायदे

स्ट्रेसफुल लाइफस्टाइलमुळे प्रत्येकजण तणावाखाली असतो. दिवसभर घर आणि ऑफिसमधील जबाबदाऱ्या आणि कामाची चिंता यामुळे सतत तणाव निर्माण होतो. तणावाचे कारण काहीही असले तरी त्याचा तुमच्या मानसिक आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो.चांगले जीवन जगण्यासाठी, शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी राहणे आपल्यासाठी महत्वाचे आहे. तणाव आणि तणावातून मुक्त होण्यासाठी मेडिटेशन हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो.मेडिटेशनमुळे तणाव दूर होतो आणि मनाला शांती मिळते. प्रत्येकजण ध्यान करू शकतो आणि त्यासाठी इतर कशाचीही गरज नाही. ध्यान करण्यासाठी तुम्हाला फक्त काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. चला जाणून घेऊया कोणती ध्यान करण्याची योग्य पद्धत आणि ध्यानाचे फायदे.ध्यान कसे करावे? सर्वप्रथम, लक्षात ठेवा की मेडिटेशनची योग्य पद्धत शोधण्याचा स्ट्रेस घेऊ नका. तुम्ही मेडिटेशनला तुमच्या जीवनाचा एक भाग बनवू शकता.दीर्घ श्वास घ्या मेयो क्लिनिकच्या मते, मेडिटेशनसाठी, प्रथम आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करा. दीर्घ श्वास घेतल्याने नैसर्गिकरित्या तणाव कमी होतो. यासाठी शांतपणे बसा, दीर्घ श्वास घ्या आणि त्यावर लक्ष केंद्रित करा.शांत वातावरण ध्यान करत असताना, आजूबाजूला कुठलाही गोंगाट होणार नाही याची काळजी घेण्याचा प्रयत्न करा जेणेकरून ध्यान करताना तुमचे मन आणि मेंदू विचलित होणार नाहीत. कंफर्टची काळजी घ्या ध्यान करताना स्वतःला पूर्णपणे आरामात ठेवण्याचा प्रयत्न करा. ध्यान करताना, आरामदायी स्थितीत बसा आणि फक्त आरामदायक कपडे घाला.आपल्या बॉडी पार्ट्सवर लक्ष केंद्रित करा ध्यान करताना शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर लक्ष केंद्रित करा आणि त्या भागातील वेदना, तणाव समजून घेण्याचा प्रयत्न करा.

शिंदे-फडणवीस हे बनवाबनवी करणारे नाहीत : संभाजी भिडे

मुंबई : मराठा आरक्षणाबाबत बोलताना ‘शिंदे-फडणवीस हे बनवाबनवी करणारे आणि लबाडीने बोलणारे नाहीत’असे मत संभाजी भिडे यांनी सरकारची बाजू घेत मांडले आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा सध्या राज्यभर गाजत आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आठ दिवसांपासून उपोषण सुरू आहे. दरम्यान, मागच्या वेळी जेव्हा जरांगे पाटलांचे उपोषण सुरू होते तेव्हा संभाजी भिडे त्यांना भेटण्यासाठी अंतरवाली सराटी येथे गेले होते. यावेळी मात्र त्यांनी सरकारच्या बाजूने प्रतिक्रिया दिली आहे. भिडे म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस ही दोन माणसे मला माहिती आहेत. राजकारणापलीकडे देशाचा विचार करून काम करणारे दोघे आहेत.ते पुढे म्हणाले की, शिंदे-फडणवीस हे बनवाबनवी करणारे आणि लबाडीने बोलणारे नाहीत. ते कधीच स्वत:चा हातचा राखून चालत नाहीत. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकरात लवकर मिटेल, अशी बाजू संभाजी भिडेंनी मांडली आहे.

झरी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको

झरी : येथील सकल मराठा समाजाच्या वतीने आरक्षणाच्या मागणीसाठी बुधवार, दि.१ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जिंतूर परभणी रोडवरील सरकारी दवाखाना परिसरात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या रास्ता रोको आंदालनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी वाहनांच्या रांगा लांगून वाहतूक ठप्प झाली होती. यामुळे प्रवाशांना मात्र अडचणींचा सामना करण्याची वेळ आली. सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रमुख मागणीसाठी झरी येथील राज्य महामार्गावर बुधवारी सकाळी १० वाजता रास्ता रोको आंदोलनास सुरूवात करण्यात आली. यामुळे वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. या वेळी आंदोलकांच्या घोषणा बाजीने परिसर दणाणून गेला होता. मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकल मराठा समाजाने आंदोलन सुरू केले आहे. राज्य शासनाला आरक्षण देण्यासाठी चाळीस दिवसांची मुदत दिल्या नंतरही ठोस पावले उचलल्या जात नसल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने आंदोलन केले जात आहे.यात पुढा-यांना गाव बंदी, कँडल मार्च, रास्ता रोको, साखळी उपोषण आदी आंदोलने शांततेच्या मार्गाने करण्यात येत आहेत. आज करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलन सकल मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता. या आंदोलनाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या वेळी ग्रामीण उपविभागीय पोलिस अधीक्षक आर. एस. शिरतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल कुरुंदकर यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.रूग्णवाहिकेस मोकळा करून दिला रस्ता झरी येथे रास्ता रोको आंदोलन चालू असताना एक ॲम्बुलन्स व एक खाजगी गाडीस जिंतूर परभणी महामार्गावरून जाण्यासाठी मार्ग मोकळा करून देवून माणुसकीचे दर्शन आंदोलकांनी घडवले.

उजेड सहन न होणं हे पित्तप्रकोपाचं लक्षण आहे का?

शरीरात होणारा हा पित्तप्रकोप ओळखण्याची एक साधीशी स्वतःच करण्याजोगी चाचणी म्हणजे ’प्रकाश-असहत्व’ अर्थात प्रकाश सहन न होणे. डॉ. अश्विन सावंत पित्त म्हणजे म्हणजे आंबटकडू चवीचे पित्त (बाईल) असा मर्यादित अर्थ नसून शरीरामध्ये रुपांतर (लेर्पींशीीळेप) करणारे, बदल (लहरपसश) करणारे एक शरीरामधील उष्ण-तत्त्व आहे हे आपण जाणून घेतले आणि पित्तप्रकोप कसा ओळखावा हे समजून घेत आहोत,जो विशेषतः शरद-ग्रीष्म या उष्ण ऋतूंमध्ये मुख्यत्वेकरुन होतो. त्यातही शरद ऋतू अर्थात ऑक्टोबर असहत्व असल्याचे स्वतःच सांगतो, ते मायग्रेनचे एक निश्चित लक्षणच आहे. मात्र तुमच्यामध्ये पित्तप्रकोपाची अन्य लक्षणे दिसत नसतानाही ’प्रकाश-असहत्व’ हा त्रास होत असेल तर शरीरामध्ये उष्णता वाढल्याचे निदान करता येते.प्रकाश नकोसा वाटणे, घराबाहेर पडल्यावर सूर्याचा उजेड (थेट किरणे नाहीत तर केवळ सभोवतालचा उजेड) सुद्धा सहन न होणे, टीव्हीवर आवडता कार्यक्रम असुनही टीव्हीकडे पाहू नयेसे वाटणे, कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे फार वेळ सलग पाहाता न येणे, टीव्ही-कॉम्प्युटरकडे काही वेळ


उजेड सहन न होणं हे पित्तप्रकोपाचं लक्षण आहे का?
लो
डॉ. अश्विन सावंत, आयुर्वेदतज्ज्ञ

हिटच्या दिवसांमध्ये जेव्हा तीव्र ऊन असते तेव्हा त्याच्या परिणामी पित्तप्रकोपजन्य विविध त्रास आपल्याला होत असतात. शरीरात होणारा हा पित्तप्रकोप ओळखण्याची एक साधीशी स्वतःच करण्याजोगी चाचणी म्हणजे ’प्रकाश-असहत्व’ अर्थात प्रकाश सहन न होणे. प्रकाश सहन न होणे म्हणजे प्रकाशकिरणे फेकणाऱ्या वस्तूंकडे पाहू न शकणे (खरं तर त्या वस्तूंमधून निघणाऱ्या प्रकाशकिरणांचा त्रास होणे). जसे-सूर्य, भट्टी, बॉयलर, टेलिव्हिजन, कॉम्प्युटर, वेल्डिंगमधून उडणाऱ्या ठिणग्या वगैरे. मायग्रेन(अर्धशिशी) हा एक आजार आहे, ज्यामध्ये रुग्ण प्रकाश-बघितल्यावर डोळ्यांची आग होणे वा डोळे लाल होणे, भिरभिरल्यासारखे होणे, डोके जड होणे, डोळे बंद केल्यावर रंगीत प्रकाश दिसणे, मळमळणे वगैरे. अशाप्रकारची लक्षणे दिसल्यास तुमच्या शरीरामध्ये पित्त (उष्णता) वाढत आहे, असे निदान करता येते.शरद ऋतूमध्ये असा त्रास होणे तसे स्वाभाविक म्हटले पाहिजे,अर्थात त्याचाही उपचार करावा लागतो. मात्र जर रुग्णाला हा त्रास दीर्घकाळ सुरु राहिला तर ते भावी पित्तविकाराचे सूचकही असु शकते. यामुळे अशा लहानसहान वाटणाऱ्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता त्यांच्यावर वेळीच पित्तशामक उपचार करावा.

'पर्यावरण भूगोलाच्या संकल्पना' या पुस्तकाचे कुलगुरु डॉ.उध्दव भोसले यांच्या हस्ते प्रकाशन

अहमदपूर :– भूगोलाचे अभ्यासक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी लिहीलेल्या रमणशिल पब्लीकेशनच्या 'पर्यावरण भूगोलाच्या संकल्पना' या पुस्तकाचे प्रकाशन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे कुलगूरू डॉ. उध्दव भोसले सरांच्या हस्ते आज संपन्न झाले. या प्रसंगी समाजशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक तथा मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेचे सदस्य प्रोफेसर डॉ.एन.टी.कांबळे, प्रा.डॉ.सतिश ससाणे आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना कुलगूरू डॉ.उध्दव भोसले सर म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखणे ही आपल्या सर्वाची गरज आहे.पर्यावरणाचा –हास हा जगातील सर्वच देशापूढील एक मूख्य समस्या आहे. मानवी जीवन अधीक समृध्द करण्यासाठी याचा अभ्यास आणी संशोधन होणे गरजेचे आहे. हे पुस्तक पर्यावरण भूगोलाच्या अभ्यासकांसाठी महत्वाचे ठरणार असल्याचे प्रतिपादन केले. पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अमूल्य वेळ देवून पुस्तक प्रकाशन केल्या बद्दल पुस्तकाचे लेखक डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी कुलगुरु डॉ. उध्दव भोसले सर यांचे आभार व्यक्त केले.

धाराशिव येथे रेल्वेरोको आंदोलन करणा–या ९० जणांवर गुन्हा दाखल

धाराशिव : प्रतिनिधी मराठा समाजाकडून वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केले जात असल्याने धाराशिव जिल्हाधिका–यांनी संचारबंदीचे आदेश दिले होते. या आदेशाचे उल्लंघन करून धाराशिव रेल्वे स्थानकावर रेल्वेरोको आंदोलन करणा–या ८० ते ९० कार्यकर्त्यांवर आनंदनगर पोलीस ठाणे येथे ३१ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी सांगितले की, धाराशिव जिल्ह्यात ३० ऑक्टोबर रोजी जिल्हाधिका–यांनी संचारबंदी लागू केली होती. या संदर्भात दिलेल्या आदेशाचे अमोल वसंतराव जाधव (रा. कारी ता. धाराशिव, अभिजीत देशमुख, अनिल माने, कुणाल निंबाळकर, मंगेश निंबाळकर, संकेत सुर्यवंशी, विशाल गडकर, श्रीकांत क्षिरसागर, सत्यजित पडवळ, अक्षय अंकुश नाईकवाडी, निलेश राम साळुंके, अंडु आदरकर, परिक्षीत विधाते, बाळा पाटील, कमलाकर शिंदे, सतिश नाना खडके, अमर गव्हाड यांच्यासह इतर अनोळखी ६० ते ७० व्यक्तींनी दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी सव्वादहा ते साडेअकराच्या सुमारास रेल्वे स्टेशन धाराशिव येथे आंदोलन केले. रेल्वे स्टेशन येथील प्लॅट फॉर्म क्र १ वर रेल्वे रुळावर जिल्हादंडाधिकारी यांचे संचार बंदी आदेश असतानाही जमाव जमवून रेल्वे रोको आंदोलन केले. या प्रकरणी पोलीस नाईक हनुमंत जालिंदर म्हेत्रे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पोलीस ठाणे येथे कलम ३४१, १४३, १८८, भा.दं.वि.सं. सह मुंबई पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ग्रीन बेल्टवर प्रार्थना स्थळ उभारण्यास, खाजगी विकासाना देण्यास बंदी घालण्याची ना अदिती तटकरे यांच्याकडे मागणी

लातूर :– ग्रीन बेल्ट हे लहान मुलांना खेळण्यासाठी, बागडण्यासाठी, ज्येष्ठ नागरिकांना, महिलांना विरंगुळा म्हणून फिरण्यासाठी, वेळ घालवण्यासाठी म्हणून ग्रीन बेल्ट आरक्षित ठेवतात पण राज्यभर ग्रीन बेल्ट वर विविध प्रार्थना स्थळ उभारली जात आहेत, खेळाची मैदाने, ग्रीन बेल्ट मोकळी न राहील्याने बालपण हिरावून जात आहे. बालवयात खेळामुळे शारीरिक, मानसिक वाढ होवून सदृढ प्रकुर्तीची पिढी निर्माण होत असतात जी देशाची भवितव्य आहेत.ग्रीन बेल्टची संख्या पाहता त्यावर होत असलेली प्रार्थना स्थळामुळे लहान मुलांना मैदाने शिल्लक राहत नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.तर दुसरीकडे जे काही बाग, बगीचे, ग्रीनबेल्ट, गार्डन हे खाजगी विकासकाना दिल्याने लहान मुलांना प्रवेशासाठी पैसे मोजावे लागत आहेत जे चुकीचे व अयोग्य असून बाल हक्क हिरावून घेणारे आहे. त्यामुळे ग्रीन बेल्ट, बाग, बगीचे जागेवरती प्रार्थना स्थळे उभारण्यास व खाजगी विकासकांना देण्यास बंदी घालण्याची मा ना अदिती तटकरे ,महीला व बालकल्याण मंत्री यांना त्यांचे मंत्रालयीन दालनात निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली यावेळी सक्षम महीला, सदृढ बालक जनआंदोलनचे अँड प्रदिपसिंह गंगणे, नवनाथ आलटे, विशाल विहिरे, सचिन कांबळे आदी उपस्थित होते

महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीच्या जि.प. तालुका अध्यक्षपदी शिवराज स्वामी यांची निवड.

खाजगी शिक्षक समितीच्या अध्यक्षपदी सुशिल वाघमारे.

चाकूर :– चाकूर येथे महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीची तालुकास्तरीय बैठक व कार्यकारिणी निवड सभा मंगळवारी घेण्यात चाकूर येथे आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मण दावणकर तर प्रमुख मार्गदर्शक राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीच्या जि.प. चाकूर तालुका अध्यक्षपदी शिवराज स्वामी यांची तर खाजगी शिक्षक समितीच्या अध्यक्षपदी सुशिल वाघमारे, तर महिला अध्यक्षा चंद्रकला चाटे सरचिटणीस अनिल रोहिनेकर,कार्याध्यक्ष बलराज गोरे, उपाध्यक्ष तुकाराम गुडपल्ले, सहसचिव प्रकाश हेंगणे,तालुका शिक्षक नेते चंद्रशेखर मिरजकर,सल्लागार सुरेश केंद्रे,संजय इंद्राळे,बाळासाहेब धुप्पे, ओमप्रकाश सुवर्णकार ,अशोक बने ,बालाजी दहिफळे तर जिल्हा संपर्क प्रमुख म्हणून गोविंदराव कोडरुल जिल्हा संघटक शिवदत्त पांचाळ यांची निवड राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देवून करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष लक्ष्मण दावणकर, डॉ बालाजी समुखराव, यांनी समितीच्या कार्याबद्दल माहिति विशद केली. तर शिवाजीराव साखरे यांनी शिक्षण पद्धती ,शिक्षकांच्या समस्या आणि संघटन बांधणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आदर्श शिक्षक समितीच्या कार्याबद्दल माहिति दिली .दिल्ली सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही शिक्षण पद्धती राबविली तर नक्कीच शिक्षकांना चांगले दिवस येतील असा आशावाद यावेळी मांडला. प्रसंगी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून शिक्षकांचे संघटन बांधणी मजबूत करून आपल्या न्याय हक्काचा लढा उभा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवदत्त पांचाळ,प्रास्ताविक वाल्मिक पंदे यांनी केले तर आभार शिवराज स्वामी यांनी व्यक्त केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे उपाध्यक्ष अशोक पांचाळ,राम दावणकर डॉ बालाजी समुखराव यांच्यासह शिक्षक बांधव उपस्थित होते.

यांच्या निवडीबद्दल शिक्षक क्षेत्रातील सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे..

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 – एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

Azimuth: 259° (W)
Pitch: -6.5° (-2.2°)
Time: 28-10-2023 12:00
Note: Sambhaji College, Murud. Ta. Latur
I.Q.A.C Organized Local Level Workshop on
New National Education Policy-2020
Powered by AngleCam

मुरुड/महेंद्र आल्टे : – येथील संभाजी महाविद्यालयात दि.२८/१०/२०२३ रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यावरील एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी संसाधन व्यक्ती म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रोफेसर डॉ. डी. एन. मोरे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ए.के. पिडगे हे उपस्थित होते. या कार्यशाळेस संबोधित करताना डॉ. डी एन. मोरे म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणानुसार शिक्षणात अनेक सारे बदल झालेले आहेत या बदलांमुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास कशाप्रकारे होईल यावरती मोठ्या प्रमाणात भर देण्यात आलेला आहे. कारण विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून, विद्यार्थी हा कणा मानून या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. डॉ. डी.एन. मोरे यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील अनेक पैलूंवरती सविस्तरपणे प्रकाश टाकत असतानाच भविष्यातील संभाव्य धोक्यांचेही विश्लेषण यावेळी त्यांनी केले. कार्यशाळेचा समारोप महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. ए.के. पिडगे यांनी केला. पाहुण्यांचा परिचय इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. दिनकर रणदिवे यांनी करून दिला. प्रास्ताविक आणि आभार आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. एम. बी. गायकवाड यांनी मानले तर कार्यशाळेचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. श्रद्धा शिंदे यांनी केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तीन वर्षे एकाच वेळी सेवा आणि वकीलचे शिक्षण घेतल्याचे स्पष्ट; मुरुडच्या डायटचे अधिव्याख्याता मिर्झाला शिक्षण आयुक्तांचा दणका

लातूर :– मुरुड येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता पदावर सेवेत असतानाच,तिकडे कंधार येथे ,खोटी कागदपत्रे सादर करुन,एलएलबीला रेग्युलरला प्रवेश घेवून कायद्याची पदवी हस्तगत केलेल्या इमाम नजीर मिर्झा यांना चौकशी अंती त्या काळातील महसूल हानी जमा करण्याचे आदेश दि.११ऑक्टोबर २०२३ जा.क्र.आशिका/२०२३/विचौ/मिर्झा/आस्था/–अ १०५/६२५९ अन्वये राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांडरे यांनी दिल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मुरुड येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत अधिव्याख्यात पदावर कार्यरत असलेले इमाम नजीर मिर्झा यांनी उच्च शिक्षणासाठी शासनाची पूर्व परवानगी न घेता,नियमानुसार सक्षम प्राधिकारी यांच्याकडून अध्ययन रजा मंजूर न करुन घेता कंधार येथील शिवाजी विधी महाविद्यालयात प्रवेश घेवून सन २०१८ ते २०२१ या कालावधीत नियमित तीन वर्षांचे एलएलबी पदवी प्राप्त केली.विशेष म्हणजे मिर्झा यांनी २१ जून २०२३ च्या अभिवेदनानुसार नियमीत तीन वर्षांचे एलएलबी पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना महाविद्यालयास १९सप्टेंबर २०१८ रोजी सादर केलेल्या आवेदनामध्ये शासकीय अधिकारी नसल्याचे व त्यांचे उत्पन्न कमी असल्याचे अभिलेखे/खोटी माहिती दिल्याचे दिले.१९ जून २०२३ रोजी एलएलबी पदवीच्या सत्र ५ व ६ ची परीक्षा त्यांनी ऑनलाईन स्वरुपात दिली,महाविद्यालयात प्रत्यक्ष वर्गास अनुपस्थित असूनही,उपस्थित असल्याची माहिती दिली आहे, संदर्भात विधान परिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक १७४१६ने आ.सुरेश धस यांनी उपस्थित केला होता.याबाबत शिक्षण आयुक्ता सुरज मांडरे यांनी विभागीय चौकशी केली.त्यावर मिर्झा यांनी दिलेल्या खुलाशानुसार त्यात ते दोषी असल्याचे स्पष्ट झाल्याने शिक्षण आयुक्त मांडरे यांनी अधिव्याख्याता इमाम मिर्झा यांची वतर्णूक,विशेषत:खोटी माहिती देवून उच्च शिक्षणास प्रवेश घेणे, परीक्षेस बसणे,प्रत्यक्ष वर्गास अनुपस्थित असनूही अभिलेख्यांवर उपस्थित दर्शविणे,नियमांचा गैरअर्थ लावणे या सर्व बाबी नैतिक अध:पतन या सदरात मोडते,असा निष्कर्ष काढून शिक्षण आयुक्त मांढरे यांनी मिर्झा यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल)नियम १९७९ मधील नियम ५(१)(दोन) नुसार त्यांची पदोन्नती,ते जेव्हा पदोन्नतीस पात्र ठरतील तेव्हापासून पुढील १० वर्षे रोखण्याची,महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल)नियम १९७९ मधील नियम ५(१)(तीन) नुसार वरील काळात मुळ कामाकडे झालेले दुर्लक्ष विचारात घेता त्या काळाचे वेतन शासनाची हानी म्हणून वसुल करण्याची,महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल)नियम १९७९ मधील नियम ५(१)(चार) नुसार पुढील एक वेतनवाढ त्यापुढील वेतनावर परिणाम न करता तीन वर्षांसाठी रोखून धरण्याची शिक्षा दिली आहे.

लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे ज्येष्ठ नेते शिवप्पा अंकलकोटे यांचे निधन

लातूर,दि.१:लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे जेष्ठ नेते व माजी नगरसेवक शिवप्पा तमण्णाप्पा अंकलकोटे यांचे दि. ०१ नोव्हेंबर २०२३ रोजी पहाटे ३ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ९४ वर्षे होते. त्यांच्या पार्थीवावर येथील बेलपत्री स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.संस्थाचालक प्रा.वीरपक्ष अंकलकोटे यांचे ते वडील होते.२लोकनेते स्व.विलासराव देशमुख यांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी होते.गेल्या तीन दशकांपासून ते लातूर कॉँग्रेस कमिटीचे कोषाध्यक्ष राहिले होते. त्यांच्याच काळात कॉँग्रेस भवनाची उभारणी झाली. ते गंजगोलाई येथील जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळाचे देखील



संस्थापक कोषाध्यक्ष व महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक होते.अंत्यसंस्कारास समाजातील सर्वच स्थरातील लोक तसेच प्रतिष्ठीत व्यक्ती उपस्थित होत्या,त्यात माजी आ.वैजनाथ शिंदे, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव बेद्रे,लक्ष्मण कांबळे,तसेच लातूर शहर कॉँग्रेस जिल्हाध्यक्ष ऍड.किरण जाधव,बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर बिडवे आणि प्राचार्य डॉ. संजय गवई,डॉ.उटगे,ऍड,मसद पटेल,माजी नगरसेवक राजा मणियार आदिंचा समावेश होता.

रब्बी हंगाम पीक स्पर्धेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर (जिमाका) : कृषि विभागामार्फत रब्बी हंगामा अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धांचे आयोजन करण्यात आहे. या स्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे. सर्वसाधन व आदिवासी गटात ही स्पर्धा होईल. ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी रब्बी पीक स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. तालुकास्तर, जिल्हास्तर, व राज्यस्तरावरील पीक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील. पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम ३०० रुपये, आदिवासी गटासाठी १५० रुपये प्रवेश शुल्क राहील. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी शेतकरी बांधवांनी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा कृषि विभागाच्या ु.झ्रीळीहळ.ारहरीरीहींीर.सेंर्ी. ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन कृषि आयुक्तालयाचे कृषि संचालक दिलीप झेंडे यांनी केले आहे.

अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन

सातबारा, ८–अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास)

पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित सातबारावरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत ,अशी आहे बक्षिसांची रक्कम

रब्बी पीक स्पर्धेसाठी तालुकास्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस पाच हजार रुपये, द्वितीय बक्षीस तीन हजार रुपये आणि तृतीय बक्षीस दोन हजार रुपयांचे राहील. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस दहा हजार रुपये, द्वितीय बक्षीस सात हजार रुपये आणि तिसरे बक्षीस पाच हजार रुपये राहील. तसेच राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षीस पन्नास हजार रुपये, द्वितीय बक्षीस चाळीस हजार रुपये आणि तिसरे बक्षीस तीस हजार रुपये राहणार आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE